# जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
## (जमाबंदी-१ शाखा)

फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

पहा:-१. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन-१०/२००५/प्रक्र.३८/ज-१/दिनांक ७/३/२००६.
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपक्रएलएनडी-१०९०/२२०२३१/प्र.क्र.२०० ज-१दिनांक ५/४/१९९१.
३. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्रक्र५३/ज-१दि.१२/७/२०११.
४. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि. २७/७/२०११.
५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि.१७/१०/२०११
६. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्रं.२०१२/मशाका/जमिन-१/प्र.क्रं.६७ दि.२८/१२/२०१२
७. महसूल व वन विभाग यांची अधिसुचना दि.३१.१२.२०१५
८. महाराष्ट्र शासन ,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.५०/ऊर्जा-५ दि.११.०४.२०१६
९. मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१६ / मशाका /जमीन१/कावि दि.१३.०६.२०१६
१०.कार्यकारी अभियंता (स्था)स्थापत्य विभाग,महाराष्ट्र राज्य विज वितरणकंपनी मर्या.लातुर यांचे पत्र क्र.९७६ दि.२०.१०.२०१६ व दिनांक.१६.१२.२०१६
११.उपविभागीय अधिकारी बीड यांचे पत्र क्र.२०१७/जमा/कावि/२१९ दि.२४.०३.२०१७.

क्रमांक२०१७/मशाका/जमा-१/प्र.क्र./कावी-३३०
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक :- /०५/२०१७
१२/८/२०१७

आदेश

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांनी संदर्भीय क्र. १० अन्वये मौजे सुर्डी बु (राजापूर) ता.गेवराई जि.बीड येथिल शासकीय गायरान जमिन स.नं./ग.नं.८२ मधुन ०.८० आर जमीन ३३/११ के.व्ही उपकेंद्रासाठी जमीनीची मागणी केली आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी बीड यांचे पत्र क्र.२०१७/जमा/कावि/२१९ दि.२४.०४.२०१७ अन्वये प्रस्ताव सादर करुन जमीन मंजूर करणेस शिफारस केली आहे.

प्रकरणात अधीक्षक अभियंता (स्था),स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था प्रविभाग महावितरण,औरंगाबाद यांचे पत्र क्र.अअ(स्था)/स्था.बां.व सुव्य./प्रवि/औ.बाद/तां/१८४ दि.१९.०५.२०१६ अन्वये उक्त शासन निर्णय दि.११.०४.२०१६ मधील निर्देशानुसार केंद्र पुरस्कृत दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना (DDUGJY) सुर्डी बु (राजापूर) ता.गेवराई जि.बीड मधील ०.८० हे.आर स.नं.८२ मधील जागेचे हस्तांतरण महावितरण कंपनीस लवकरात लवकर करणे बाबत निर्देशीत केले आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २०,३१ नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ५,६,१५ ला व महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्रक्र५३/ज-१ दि.१२.७.२०११, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि.२७.७.२०११, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-दि.१७.१०.२०११ तसेच महसूल व वन विभाग यांची अधिसुचना दि.३१.१२.२०१५ , मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१६ / मशाका /जमीन१/कावि दि.१३.०६.२०१६ ,महाराष्ट्र शासन ,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचा शासन निर्णय दि.११.०४.२०१६ मधील तरतुदीनुसार केंद्र पुरस्कृत दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजने अंतर्गत (DDUGJY) मौजे सुर्डी बु (राजापूर) ता.गेवराई जि.बीड येथिल शासकीय गायरान जमिन स.नं./ग.नं.८२ मधुन ०.८० आर जमीन ३३/११ के.व्ही उपकेंद्रासाठी कार्यकारी अभियंता (स्था)स्थापत्य विभाग,महाराष्ट्र राज्य विज वितरणकंपनी मर्या.लातुर यांना शासकीय जमीन सदर कंपनीस भाडे पट्टयाने रक्कम रुपये १/- प्रति वर्ष या नाममात्र भुई भाडयाने ३० वर्षासाठी त्याच तत्वावर पुढील नुतनीकरणाच्या तरतुदीसह खालील चतू:सिमा प्रमाणे अटी व शर्तीस आधिन राहून भाडेपट्टयाने प्रदान करण्यात येत आहे.

**चतू:सिमा**

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | :- | रस्ता (रोड) |
| पश्चिमेस | :- | स.नं.८२ मधील उर्वरीत जमीन |
| दक्षिणेस | :- | स.नं.८२ मधील उर्वरीत जमिन |
| उत्तरेस | :- | स.नं.८२ मधील उर्वरीत जमिन |

**अटी/ शर्ती**

१. जमीन भाडेपट्टयाने दिलेल्या दिनांकापासून जमीनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी म.रा.वि.वि.कंपनीची असेल व जमीनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी करावयाचा नसेल तर सदरील जमीन

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
(जमाबंदी-१ शाखा)
फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

शासनाकडे कोणतीही नुकसान भरपाई न मागता परत करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता (स्था)स्थापत्य विभाग,महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.लातुर यांचेवर राहील.

२. शासन परिपत्रक / शासन निर्णयामधील तरतुदीनुसार शासन जे भोगाधिकार मूल्य निश्चित करेल ते भरण्याचे व जमीन प्रदानाबाबत ज्या अटी व शर्ती असतील त्या तंतोतंत पाळव्या लागतील.

३. शासकीय जमिनीचे मुल्यांकन प्रचलित वार्षिक बाजारमुल्य दर तक्ता प्रमाणे केल्यानंतर त्या मुल्यांकनाच्या किंमतीच्या वाढीव विद्युत पायाभुत सुविधा शासन निर्णय दि.११.०४.२०१५ प्रमाणे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता (स्था)स्थापत्य विभाग,महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.लातुर यांनी करावी.

४. सदरच्या विद्युत पायाभुत सुविधा तीन वर्षाच्या कालावधीत संबंधीत कंपनीने स्वनिधीतुन आवश्यक ठिकाणी उभारण्याची कार्यवाही करावी. वाढीव विद्युत पायाभुत सुविधांचे मुल्यांकन त्या त्या वर्षाच्या संबंधित वीज कंपनीच्या प्रचलित दर सुचीनुसार करण्यात यावे.

५. सदर विद्युत पायाभुत सुविधा उभारणीच्या कामकाजाबाबतचा आढावा दर तीन महिन्यांनी आवश्यक असणारे अभिलेख व कागदपत्रे कार्यकारी अभियंता (स्था)स्थापत्य विभाग,महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.लातुर यांनी या कार्यालयास सादर करावीत.

६. कार्यकारी अभियंता (स्था)स्थापत्य विभाग,महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.लातुर यांनी सदर शासकीय जमीनीचा भाडेपट्टा प्रतिवर्ष नाममात्र भाडे १/- प्रमाणे ३० वर्षाचे रक्कम रुपये ३०/- शासन खाती विहीत लेखाशिर्षाखाली भरणा करुन चलनाची प्रत या कार्यालयास सादर करावी.

७. सदर जमीनीचे ३० वर्षानंतर नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

८. उपरोक्त जमीनीची कंपनीस आवश्यकता नसेल तेव्हा ती जमीन महसूल खात्यास परत करावी लागेल व त्या जमीनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमानुसार करण्यात येईल.

९. मंजूर केलेल्या जमीनी पैकी १० टक्के क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे कंपनीस बंधनकारक राहील व या अटीचे उल्लंघन केल्यास शर्तभंग समजून कार्यवाही केली जाईल.

१०. सदर जमीन दिलेल्या प्रयोजनार्थ एक वर्षाच्या आंत उपयोगात आणावी,अन्यथा जमीन परत घेण्यात येईल.

११. कंपनी सदर जमीन भोगवटदार वर्ग-२ म्हणून धारण करेल मंजूर आदेशातील अटीचा भंग झाल्यास सदर जमीन परत बांधकामासह त्यावरील सर्व बाबीसह सरकार जमा करण्यास पात्र राहील व कंपनीस कोणताही मोबदला मागण्याचा हक्क राहणार नाही.

१२.ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यात आले आहे त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहिजे. त्या जमीनीचे हस्तांतरण ,विक्री,लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी बीड याचे पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

१३. कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांनी सह जिल्हा निबंधक बीड यांचे मुल्यांकन सन २०१७ चे अहवालानुसार रक्कम रुपये ३२,१०,०००/- च्या वाढीव विद्युत पायाभुत सुविधा शासन निर्णय दि.११.०४.२०१६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देणे बाबतचे हमीपत्र या कार्यालयास सादर करावे.

१४. शासन निर्णय दिनांक ११.०४.२०१६ मधील अटी / शर्तीचे व निर्देशाचे पालन करण्याची जाबाबदारी संबंधीत कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांची राहील.

OIC

जिल्हाधिकारी बीड

**प्रतिलिपी,**

१. मा. अपर मुख्य सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहीतीस्तव सविनय सादर.
३ कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर .
४. उप विभागीय अधिकारी, बीड
५. उप अधिक्षक भूमी अभिलेख गेवराई यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
६. तहसिलदार गेवराई यांना देवून कळविण्यात येते की उप अधिक्षक भूमी अभिलेख गेवराई याचे कडील सदर जमीनीच्या मोजणी प्रमाणे जमीनीचा ताबा कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांना देवून ताबा पावती व पंचनाम्यासह अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.
७. अधिक्षक भूमी अभिलेख, बीड

जिल्हाधिकारी बीड

OIC

## जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
## (जमाबंदी-१ शाखा)

फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

संदर्भ:- १. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन-१०/२००५/प्रक्र.३८/ज-१/दिनांक ७/३/२००६.
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपक्रएलएनडी-१०९०/२२०२३१/प्र.क्र.२०० ज-१दिनांक ५/४/१९९१.
३. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्रक्र५३/ज-१दि.१२/७/२०११.
४. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि. २७/७/२०११.
५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि.१७/१०/२०११
६. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्रं.२०१२/मशाका/जमिन-१/प्र.क्रं.६७ दि.२८/१२/२०१२
७. महसूल व वन विभाग यांची अधिसुचना दि.३१.१२.२०१५
८. महाराष्ट्र शासन ,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचा शासन निर्णय क्र.सौरप्र-२०१६/प्र.क्र.३५४/ऊर्जा-७ दिनांक १४ जुन २०१७
**९.महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग निर्णय क्रमांक : जमीन-२०१७/प्र.क्र.१७९/ज-१ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २९ नोव्हेंबर २०१७**
१०.मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१६ / मशाका /जमीन -१/कावि दि.१३.०६.२०१६
११. उपमुख्य अभियंता, (स्था) स्थापत्य बांधकाम मंडळ महानिर्मिती , परळी वै. जि.बीड यांचे पत्र क्र.उप मु.अ. स्था.बां.मं./परळी / नं.०६४३ दिनांक २५ जुलै २०१७
१२.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक , महानिर्मिती कंपनी मर्या.मुंबई यांचे पत्र क्र.मुअ./सौर-प्र/शासकीय जमीन ४८८/ नं. ०४९५ दिनांक ३१.८.२०१७
**१३. तहसिलदार परळी वै. यांचे पत्र क्र.२०१८/जमा-२/ ताबा कावी दिनांक ११.४.२०१८**
**१४.** उपमुख्य अभियंता (स्था) स्थापत्य बांधकाम मंडळ महानिर्मिती , परळी वै. जि.बीड यांचे **लेखी हमीपत्र** दिनांक २३.४.२०१८
१५.उप विभागीय अधिकारी परळी वै.यांचे पत्र क्र.२०१८/जमा/त.मा/ताबा/कावी दि.२३.४.२०१८
१६.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांचे पत्र क्र.साप्रवि/संकिर्ण/कावि ३५६ /२०१८/दि.०५.६.२०१८

क्रमांक२०१७/मशाका/जमा-१/प्र.क्र./कावी-
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक :-०८/ ०६ /२०१८

**आदेश**

ज्या अर्थी संदर्भ क्रमांक ११ नूसार उपमुख्य अभियंता, (स्था) स्थापत्य बांधकाम मंडळ महानिर्मिती , परळी वै. जि.बीड (महाराष्ट्र राज्य उर्जा निर्मिती कंपनी मर्या. ) यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत मौजे नाथ्रा ता.परळी वै.जि.बीड येथिल शासकीय गायरान जमिन स.नं.१८२ मधुन ६ हे. शासकीय जमीन प्रस्तावित ३.०० मेगा वॅट सौर उर्जेवर आधारीत (सौर उर्जा प्रकल्पासाठी) शेती फिडर प्रकल्प उभारणीसाठी महानिर्मिती कंपनीने मान्यता दिलेल्या प्रकल्पासाठी शासकीय जमीनीची मागणी केली आहे.

ज्या अर्थी, संदर्भ क्र.१३ अन्वये तहसिलदार परळी वै.यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत उप मुख्य अभियंता (स्था) स्थापत्य बांधकाम मंडळ महानिर्मिती परळी वै. जि.बीड यांना मौजे नाथ्रा ता.परळी वै.जि.बीड येथील प्रकल्पासाठी गट क्र.१८२ मधील ६ हे शासकीय जमीन निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध असल्या बाबत अ,ब,क, ड आणि ७/१२ व ग्रामपचांयत ठरावासह व मोजणी नकाशासह प्रस्ताव सादर केला आहे.

संदर्भ क्रमांक ८ नूसार राज्यात कृषी क्षेत्रासाठी माफक दरात व आवश्यकतेनूसार विजेचा पुरवठा व्हावा या दृष्टीकोणातून राज्यात ज्या ग्रामिण भागामध्ये गावठाण व कृषी वाहिनीचे विलगीकरण झाले अशा ठिकाणी कृषी वाहिनीचे सौर उर्जाद्वारे विदयुतीकरण करण्याच्या योजनेस मान्यता दिलेली असून सदर योजनेस मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी संबोधण्यात आले आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ ( नि.श्रे. बीड ) यांनी त्यांचे पत्र दिनांक २०.४.२०१८ नूसार मौजे नाथ्रा ता.परळी वै.येथील स.न.१८२ मधील जमीनीचा प्रति हे. दर रुपये ५,९५,०००/- कळविले असुन सदर ६ हे जमीनीची किंमत रुपये ३५,७०,०००/- एवढी होत आहे. तथापी संदर्भ क्रमांक ९ दिनांक २९ नोव्हेंबर २०१७ चे शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जमीन महसुल संहिता , १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनंची विल्हेवाट करणे) नियम १९७१ मधील तरतूदी अन्वये प्राप्त अधिकारात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना या प्रकल्पाकरिता आवश्यक असलेल्या क्षेत्रात निश्चित केलेली शासकीय जमीन महानिर्मिती या कंपनीस ३० वर्ष कालावधीसाठी वार्षिक रु.१/- या नाममात्र दराने भाडेपट्ट्याने हस्तांतरीत करण्यास शासनाने मान्यता प्रदान केली आहे. संदर्भ क्र.१६ नूसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी शिफारस पत्र दिले आहे.

... जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २०.३१ नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय